# D.G. ASSOCIATES

**A Sister Concern of Merisis Consultants Private Limited**
**"Division of Society Plus"**
**Address:** Office No.145, 3rd Floor, Kumar Prestige Point, Shukrawar Peth Pune 411002.
***Project Management Consultancy for Redevelopment***

---

दिनांक :-०६.०४ .२०२५

प्रति,
सर्व सभासद
मार्फत:- मा.अध्यक्ष/सचिव
देवव्रत अपार्टमेंटस्
हिस्सा नं.०९, ब्लॉक नं.०१, विठठ्ल मंदिर रोड,
श्रीमान सोसायटी जवळ, कर्वेनगर,पुणे. ४११ ०५२.

विषय:- पुनर्विकासाच्या आत्तापर्यंत झालेल्या कामाबाबतचा आढावा.

सन्माननीय सभासद,

आपल्या संस्थेच्या पुर्नविकास प्रोसेसमध्ये आत्तापर्यंत आपण प्रत्येक प्रोसेस ही नियमावलीनुसार करीत आलो आहोत त्यामधील महत्वाचा टप्पा म्हणजेच दिनांक ०२/०२/२०२५ रोजी आपण ०७ विकसकांना युनायटेड वेस्टर्न हॉल,कर्वेनगर येथे सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात आले होते,प्रत्येक विकसकाने त्यांनी आपल्या प्लॉटच्या संदर्भात कशा प्रकारे अभ्यास केला आहे त्याचे सादरीकरण सर्व सभासदांसमोर केल्यामुळे सभासदांना सुध्दा आपण आपल्या पुर्नविकासाच्या योग्य त्या दिशेने वाटचाल करीत आहोत असा विश्वास निर्माण झाला. सभासदांनी विकसकाला अनेक प्रश्न विचारले ते आपल्या प्लॉटच्या संदर्भातील असो किंवा कायदेशीर कागदपत्रांमधील त्रुटी संदर्भात असो अशा सर्व प्रकारच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे सर्व विकसकांनी

देऊन सभासदांच्या शंकांचे निरसन केले. सादरीकरण झाल्यानंतर संस्थेने सर्व सभासदांना वोटींगव्दारे विचारणा केली असता ०७ पैकी ०५ विकसकांच्या बाबतीत योग्य तो विचार केला आणि तशी पुढील कार्यवाही करावी असा संस्थेने पुनर्विकास समितीला अधिकार देण्यात आले त्यातील पहिली पायरी म्हणजे, प्रत्येक विकसकाला आपल्या प्लॉटच्या संदर्भातील कागदपत्रे दिल्यानंतरच त्यांनी तसा अभ्यास करून निविदा भरल्या होत्या पण प्रत्येक विकसकाला आपला प्लॉट किती स्क्वे.फुटचा आहे अशी संभ्रमता दिसुन येत होती म्हणुन संस्थेने आपल्या सर्वांच्या संमतीने प्लॉटची प्रायव्हेट मोजणी करून घेऊन संस्थेचे प्रकल्प सल्लागार यांना दिनांक १६/०२/२०२५ रोजी Swojas, Mehandale Landmarks, Signet, RDB Group & Scon HD यांना संस्थेने केलेली मोजणी पाठवावी असे ई-मेलव्दारे कळविण्यात आले आणि तशी ई-मेल प्रकल्प सल्लागार यांना संस्थेकडुन ०५ विकसकांना ई-मेलव्दारे कळविण्यात यावे असे सांगण्यात आले. विकसकांनी परत एकदा प्लॉटच्या संदर्भात अभ्यास करून तुम्ही तुमची रिव्हाईज्ड ऑफर दिनांक २८/०२/२०२५ पर्यंत देण्यात यावी असे ई-मेलव्दारे पाचही विकसकांना कळविण्यात आले.

पाचही विकसकांनी सांगितलेल्या तारखेप्रमाणे आपली रिव्हाईज्ड ऑफर ई- मेलव्दारे प्रकल्प सल्लागार यांना पाठविण्यात आल्यानंतर Signet यांनी त्यांच्या ई-मेलमध्ये ऑफर ही १८ टक्के आणि Swojas यांनी सरकारी मोजणी आणि प्रॉपर्टी कार्ड अशी त्यांची मागणी असल्यामुळे पुढे त्यांचा विचार केला गेला नाही, संस्थेच्या पुनर्विकास समितीने राहीलेले जे ३ विकसक आहे ज्यांची प्राथमिक ऑफर आणि कागदपत्रांची जबाबदारी इत्यादी. हे दोनही आपल्या गोष्टी पुर्ण करायला तयार आहे अशा तीनही विकसकांची म्हणजेच Mehandale Landmarks, RDB Group & Scon HD यांच्या स्वतंत्र प्राथमिक मिटींग पुनर्विकास समिती आणि विकसक यांच्यामध्ये दिनांक २२/०३/२०२५ आणि २९/०३/२०२५ रोजी प्रकल्प सल्लागार म्हणजेच सोसायटी प्लसच्या

ऑफिसमध्ये मिटींगचे नियोजन करण्यात आले, पुनर्विकास समितीने संस्थेच्या वतीने काही प्रश्नांची नियमावली तयार करून तसे प्रश्न त्यांना विचारण्यात आले प्रत्येक विकसकांकडुन सर्व प्रश्नांना सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला.

या सर्व गोष्टी झाल्यानंतर पुनर्विकास प्रोसेसमधील दुसरा टप्पा म्हणजेच विकसकांच्या त्यांनी केलेल्या रिडेव्हलपमेंट साईट व्हिजिट करण्याचे ठरले आहे त्याप्रमाणे प्रत्येक विकसकाला आपण २ साईट दाखविण्याचे कळविण्यात आले आहे त्याप्रमाणे विकसक त्यांच्या साईटचे लोकेशन आणि साईटचा पत्ता पाठविल्यानंतर सर्व सभासदांना एक आठवडा आधी कळविले जाईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी ही नम्र विनंती, पुढील कार्यवाहीचे नियोजन संस्थेच्या Whats Group ला आणि ई-मेलव्दारे कळविले जाईल जास्तीत जास्त सभासदांनी विकसकांच्या सादरीकरणासाठी उपस्थिती दाखविली होती तसेच साईट व्हिजिटचे नियोजन करण्यात येईल तेव्हा सुध्दा आपण उत्सफुर्त प्रतिसाद द्याल याबाबत खात्री आहे.

आपल्या सर्वांच्या भरघोस प्रतिसादाबदद्ल पुनर्विकास समितीच्या वतीने आपले हार्दिक आभार

धन्यवाद.......

डी.जी.असोसिएटस्

For D. G. Associate

D.C.Gaikwad

Proprietor